## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ,मुंबई.

विषय :महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार राज्य सल्लागार समिती तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाची दि. २१.११.२०१२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत.

दिनांक २१.११.२०१२ रोजी दुपारी ०३.०० वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार राज्य सल्लागार समिती तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाची संयुक्त_बैठक महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ सभागृहात पार पडली.

सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा.श्री.हसन मुश्रीफ, | - | कामगार मंत्री तथा अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार राज्य सल्लागार समिती |
| २. | मा.श्री. मधुकर गायकवाड | - | कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, |
| ३. | श्री.वि.अ.मोरे | - | संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य. |
| ४. | मा.आ.श्री.नरेंद्र पाटील. | - | सल्लागार समिती सदस्य, |
| ५. | मा.आ.श्री.अनिल भोसले | - | सल्लागार समिती सदस्य. |
| ६. | डॉ.गजानन देसाई | - | सल्लागार समिती सदस्य |
| ७. | श्री. बी.जी.मांगले | - | सल्लागार समिती सदस्य. |
| ८. | श्री.आसिफ उमर कासकर | - | सल्लागार समिती सदस्य. |
| ९. | श्री.मुस्ताक अ.दळवी | | मंडळ सदस्य |
| १०. | श्री. अनिल दत्तात्रय ढवळे | - | मंडळ सदस्य |
| ११. | श्री. रमेश सो. सारडा | - | मंडळ सदस्य |
| १२. | श्री. प्रकाश देवतळे | - | मंडळ सदस्य |
| १३. | श्री.महेश मुद्या | - | मंडळ सदस्य |
| १४. | श्री. वसंत गणपत सावंत | - | मंडळ सदस्य |
| १५. | श्री. मुनवर शेख | - | मंडळ सदस्य |
| १६. | श्री. राजेश फुले | - | मंडळ सदस्य |
| १७. | श्री. दादाराव डोंगरे | - | मंडळ सदस्य |
| १८. | श्रीमती राधिका गायकवाड | - | मंडळ सदस्य |
| १९. | श्री.आर.के.शर्मा | - | LIC,मुंबई. |
| २०. | श्री.आर.आर.हेंद्रे | - | अपर कामगार आयुक्त(प्रभारी), पुणे |

m.२१.११ ० ३

| | | | |
|---|---|---|---|
| २१. | श्रीमती शिरीन लोखंडे | - | कामगार उप आयुक्त,मुंबई शहर |
| २२. | श्री.दे.द.बांबोडे | - | कामगार उप आयुक्त,औरंगाबाद |
| २३. | श्री.बी.आर.देशमुख | - | सहाय्यक कामगार आयुक्त,पुणे. |
| २४. | श्री.बी.एम.आंधळे | - | सहाय्यक कामगार आयुक्त,पुणे. |
| २५. | श्री.वि.रा.पानबुडे | - | सहाय्यक कामगार आयुक्त, नागपूर. |
| २६. | श्री.बाळासाहेब दि.गुजर | - | सहाय्यक कामगार आयुक्त, नागपूर. |
| २७. | श्री.सोमनाथ पोटरे | - | कक्ष अधिकारी (काम-७ अ),मंत्रालय,मुंबई |
| २८. | श्री.र.वि.कुलकर्णी | - | सदस्य सचिव |

बैठकीच्या सुरवातीस मा. अध्यक्ष यांनी सर्व सदस्यांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार राज्य सल्लागार समिती तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांचे सदस्य यांची संयुक्तीक बैठक घेवून मंडळाच्या योजनेचा आढावा घेवून ज्या काही सूचना येतील त्यावर एकत्रितरित्या विचारविनिमय करण्याकरिता बैठक आयोजित करण्यात आली असल्याचे मा. अध्यक्ष महोदयांनी सांगितले.

आपल्या राज्यामध्ये उपकर ब-यापैकी जमा झालेला असून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी विविध कल्याणकारी योजनांची आखणी केलेली आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमाची तसेच कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी तसेच नवीन कल्याणकारी योजना अमलांत आणण्यासाठी कामगार संघटनांची जी मते आहेत, ती जाणून घेणे आवश्यक आहे व कामगार संघटनांनी ज्या काही सूचना केल्या आहेत त्या सूचनांवर जास्तीतजास्त चांगले निर्णय घेवून बांधकाम कामगारांना त्याचा लाभ देता येईल.

बैठकीत नाका कामगारांचा विषय उपस्थित केला गेला. नाका कामगार हे रोज कामाची वाट पहात नाक्यावर उभे असतात व हे कामगार बांधकाम कामगार आहेत. हे रोज वेगवेगळया मालकांकडे काम करतात. सदस्यांनी यांच्यासाठी वेगळा निर्णय होणे आवश्यक असल्याची मागणी केली. मा.अध्यक्ष महोदयांनी सांगितले की, नाका कामगारांना जोपर्यंत त्यांचे ९० दिवसांचे प्रमाणपत्र असणार नाही तो पर्यंत त्यांची मंडळात नोंदणी करता येत नाही.

केंद्र

सरकारने निर्णय घेतल्यास याची अंमलबजावणी होवू शकेल. मात्र ९० दिवसाचे प्रमाणपत्र दिल्यास अशा कामगारास तातडीने नोंदीत करण्यात येवू शकेल.

दाळू कामगार, विटभट्टी कामगार, नाका कामगार इत्यादीबाबत विचारविनिमय होण्यासाठी तज्ञ समिती बनविली जावी व त्यावर सीटू या संघटनेचा सदस्य असावा असे मा.अध्यक्ष महोदयांनी सुचविले. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांने आतापर्यंत बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी १५ योजना घाषित केलेल्या आहेत. या योजनांची अंमलबजावणी हवी तेवढी होत नाही. त्यामुळे या योजना राबविण्यासाठी विशिष्ट मॅकॅनिझम करणे आवश्यक आहे.

सदस्यांनी जिल्हास्तरावर बांधकाम कामगार कल्याण मंडळ स्थापन करुन योजनांची अंमलबजावणी करण्याच्या सूचना केली. कामगार आयुक्त,मुंबई यांनी जिल्हास्तरावर अशाप्रकारचे मंडळ स्थापन करता येवू शकत नाही कारण बांधकाम कामगार मंडळ हे महाराष्ट्र स्तरावरील असल्याचे विस्ताराने सांगण्यात आले.

बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात सध्या स्वतंत्र कर्मचारी वर्ग नाही. तो कर्मचारीवर्ग असावा असे सदस्यांनी प्रतिपादन केले. यावर मा.अध्यक्षांनी शासनाने बांधकाम मंडळासाठी ५८ पदे मंजूर केलेली असल्याची माहिती दिली.

बांधकाम कामगारांना भविष्य निर्वाह निधी, उपदान व दिवाळीला बोनस या योजना लागू असाव्यात असे सदस्यांनी सांगितल्यावरुन मा.अध्यक्षांनी स्पष्ट केले की, बांधकाम कामगारांना भविष्य निर्वाह निधी योजने बरोबरच त्यांना उपदान व बोनस त्या त्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार लागू आहेत म्हणून दिवाळी बोनसबाबत मंडळाने स्वतंत्र विचार करण्याची आवश्यकता नाही.

नोंदीत बांधकाम कामगारांना घरकुलाची अत्यंत आवश्यकता असून, त्यासाठी स्वतंत्रपणे विचार केला जाणे आवश्यक असल्याचे श्री.ढवळे यांनी सांगितले. बांधकाम कामगार मंडळाने नोंदीत बांधकाम कामगारांच्या घरासाठी रु.२ लाख व घरदुरुस्तीसाठी रु.१,५०,०००/- राशी उपलब्ध केलेली आहे. श्री.ढवळे यांनी अशा बांधकाम कामगारांसाठी Cluster (चाळ)

घरे असावीत व त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात ही योजना राबवावी असे सांगितले. यावर मा.अध्यक्षांनी याबाबत विचारविनिमय केला जाईल असे सांगितले.

बांधकाम कामगारांच्या मुलीच्या लग्नाचा प्रश्न गंभीर असून, बांधकाम कामगार त्याच्या मुलीच्या लग्नाचा खर्च सहन करण्यास असमर्थ आहे. यावर विचारविनिमय होवून मा.अध्यक्षांनी बांधकाम कामगारांच्या मुलीच्या लग्नाप्रित्यर्थ रु. २५,०००/- अनुदान देण्यात यावे. तसेच सामुहिक विवाहाबाबत विचारविनिमय केला जाईल असे सांगितले.

बांधकाम कामगारांची नोंदणी फारच कमी प्रमाणात झाली असल्याचे सांगितले व ही नोंदणी वाढविणे गरजेचे आहे. मा. कामगार आयुक्तांनी बांधकाम कामगारांची महाराष्ट्रात नेमकी किती संख्या आहे, याचा निश्चित आकडा उपलब्ध नसल्याचे सांगितले व कामगार आयुक्तालयाच्या प्रत्येक विभागास बांधकाम कामगारांच्या नोंदणीसाठी रु. ५ लाखाची तरतूद करण्यात आलेली असून तरतुदीच्या अनुषंगाने कामगारांचे मेळावे घेणे व जाहिराती देणे इत्यादी अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. प्रत्येक विभागाने हा खर्च रु.५ लाखातून भागवावयाचा आहे

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळाने गंभीर आजारासाठी रु. १०,०००/- तरतुद केलेली असून, गंभीर आजार असलेल्या कामगारास हे सहाय्य दिले जाते, हे सहाय्य अत्यंत अल्प असून ते वाढवून रु.२५,०००/- करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. यावर मा.अध्यक्षांनी सहमती दर्शविली.

मंडळ सदस्य श्री.महेश मुद्दा यांनी बिल्डर्स असोसिएशन सारख्या बांधकाम व्यवसायिकांशी संपर्क साधून त्यांचे सहकार्य मिळण्यासाठी कॉन्फरन्स घ्यावी, असा मुद्दा उपस्थित केला. यास मा.अध्यक्षांनी सहमती दर्शविली. त्याचप्रमाणे मंडळाच्या योजनेची माहिती तळागाळाला होण्यासाठी जाहिरातीवर भर देण्याचे सुचविले. यावर मा.कामगार आयुक्तांनी जाहिरात देण्याच्या योजनेबाबत माहिती दिली. मा.मंत्रीमहोदयांनी बसवरील जाहिरातीतील बसेसची संख्या वाढविण्याच्या सुचना दिल्या.

बैठकीच्या शेवटी अध्यक्षांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

-X-X-X-X-X-X-X-X-